# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दुरध्वनी : ०७१२-२६६०९४७ Email : directornss@sgbau.ac.in


क्र.संगाबाअवि/१३/५६/२०१७
दिनांक : १८.०८.२०१७

प्रति,
प्राचार्य/विभागप्रमुख/प्रभारी अधिकारी,
सर्व संलग्नित महाविद्यालये/पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग/
पद्व्युत्तर शैक्षणिक विभागाचे प्रशासकीय केंद्र,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**विषय : संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजनेंतर्गत आवेदनपत्र पाठविण्याबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र विद्यापीठे प्रावधानानूसार विद्यापीठाची उद्दिष्टये साध्य करण्यासाठी आवश्यक व शक्य असेल असे सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणेच्यादृष्टीने आखण्यात आलेले कोणतेही इतर कार्यक्रम, सेवा किंवा उपक्रम यामध्ये सहभागी करण्याची तरतूद उपलब्ध असून विद्यापीठीय शिक्षणाच्या उद्दीष्टांमध्ये विद्यार्थ्याला अध्ययन, अध्यापन व संशोधन एवढयापुरते मर्यादित न ठेवता त्याला समाजपयोगी सुसंस्कृत नागरिक घडविणे हे शिक्षणाच्या अनेक उद्दिष्टांपैकी एक प्रमुख उद्दीष्ट आहे.

शिक्षण हा मुलभूत अधिकार आहे व विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याचा सर्वाधिक स्त्रोत हा ग्रामीण भागातील शेतकरी व शेतमजुरांच्या पाल्यांचा आहे. वर्तमान काळातील शेतकरी व शेतमजुर यांची आर्थिक स्थिती व दयनिय अवस्था लक्षात घेता महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना जर अशा पाल्यांच्या शेतकरी पालकांवर दुर्दैवाने आत्महत्येची पाळी आल्यामुळे किंवा अन्य दुर्घटनेमुळे पालकांचे आर्थिक स्त्रोत बंद झाल्यास तसेच देशाच्या संरक्षणार्थ सीमेवर लढणाऱ्या सैनिकांना वीरमरण प्राप्त झाल्यास त्यांच्या पाल्य/विधवा पत्नीला लाभ देता येईल. महाविद्यालयातील शिक्षण अर्धवट सोडण्याची आपत्ती त्यांच्यावर ओढवत असेल व तो पाल्य/विधवा पत्नी पुढील शिक्षणापासून वंचित राहात असेल तर त्यांना पुढील शिक्षण सुरळीत घेता यावे ही सामाजिक जाणिव जागृत ठेवण्याचे उद्दिष्ट समोर ठेऊन 'संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजना' सुरु केल्याने आर्थिक कमकुवत गटातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळेल.

याकरीता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाव्दारे दि. १०.०३.२०१७ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेने विषय क्रमांक ६७ अन्वये संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजनेचे प्रारुप नियम तयार करण्यास मान्यता प्रदान केली आहे.

आपणास विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेल्या नियमावलीनुसार सोबतचे आवेदन पत्र सत्र २०१७-२०१८ मध्ये आपल्या महाविद्यालयातील पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून भरुन घेवून प्राप्त आवेदन पत्र प्राचार्यांचे स्वाक्षरीनिशी व आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्यप्रती स्वाक्षांकित करुन संचालक, विद्यार्थी विकास विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे कार्यालयास दिनांक ३१ ऑगष्ट, २०१७ पर्यंत किंवा पूर्वी पोहचेल अशा बेताने पाठवावी.

सोबतचे आवेदनपत्रात विद्यार्थ्यांची माहिती महाविद्यालयामार्फत, प्राचार्यांचे स्वाक्षरीनिशी, आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्यप्रती स्वाक्षांकित नसल्यास अथवा अपूर्ण माहिती सादर केल्यास तसेच विहित मुदतीत आवेदन पत्र प्राप्त न झाल्यास आवेदन पत्र विचारात घेतले जाणार नाही याची कृपया कटाक्षाने नोंद घ्यावी. सदर माहिती ही विद्यापीठाचे www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर **Students Development** या शिर्षातील **Letter** या उपशिर्षामध्ये उपलब्ध करण्यात आलेली आहे. कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

आपला विश्वासू,

**(डॉ. अविनाश असनारे)**
प्र.संचालक,
विद्यार्थी विकास
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**सहपत्रः नियमावली व आवेदन पत्र**

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग
### संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजना नियमावली

**१. योजनेचे नांव** - या नियमांना 'संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजना' या नावाने संबोधिले जाईल.

**२. योजनेची अंमलबजावणी -**

सदर नियम व्यवस्थापन परिषदेने मान्यता प्रदान केल्याचे तारखेपासून अंमलात येतील.

**३. व्याख्या** -

या नियमांमधील उपयोगात आणल्या जाणाऱ्या शब्दांच्या व्याख्या खालीलप्रमाणे राहतील.

**विद्यार्थी -**

विद्यार्थी म्हणजे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या स्थानिक महाविद्यालय/संस्था /विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग (पदव्युत्तर विद्यार्थी)/ घटक महाविद्यालय / स्वायत्त महाविद्यालय येथे नियमितरित्या पदवी अभ्यासक्रमांना प्रवेशित असलेला विद्यार्थी / विद्यार्थीनी.

**४.उद्दिष्टे -** या योजनेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे राहतील.

अ) ज्यांना शासनाची / राज्याची / इतर कोणत्याही प्रकारची शिष्यवृत्ती किंवा कोणतीही आर्थिक मदत उपलब्ध नाही. अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजु आणि होतकरु विद्यार्थ्यांना शिक्षणसंपादनासाठी सहकार्य म्हणून शैक्षणिक शुल्काची परिपुर्ती करणे. (प्रवेश व परीक्षा शुल्क)

ब) मानवी मुल्यांची जोपासना करणे.

क) विद्यार्थ्यांमध्ये आत्मबळ वृध्दिंगत करणे.

ड) सामाजिक संवेदनेचे भान जागृत करणे.

**५.पात्रता** -

सदर योजनेचा लाभ हा जे विद्यार्थी अथवा विद्यार्थीनी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या स्थानिक महाविद्यालये / संस्था / विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग/घटक महाविद्यालय / स्वायत्त महाविद्यालय येथे नियमितरित्या पदवी अभ्यासक्रमांना नियमित प्रवेशित असतील त्यांचा निर्धारीत पध्दतीचा अवलंब करुन घेता येईल.

**६. अर्जाचा नमुना व सादर करावयाची माहिती** -

सदर योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना परिशिष्ट 'अ' नुसार अर्ज संचालक विद्यार्थी विकास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे नांवे संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत त्यांच्या शिफारशीने महाविद्यालयाच्या वतीने संचालक, विद्यार्थी विकास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्याकडे सादर करावे लागतील. परंतु अपवादात्मक परिस्थितीमध्ये मा.कुलगुरूंचे अनुमतीने अर्ज बोलविणे अथवा स्विकारणे यांचे अधिकार संचालक, विद्यार्थी विकास यांना राहतील.

**७. माहितीचे प्रकाशन -**

सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता प्रतिवर्षी संचालक, विद्यार्थी विकास यांचे कार्यालयामार्फत विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळावर सदर योजनेसंबंधीची माहिती माहे सप्टेंबर चे चौथ्या आठवड्यात प्रकाशित करण्यात येईल.

**८. समिती व कालावधी** -

परिच्छेद क्रमांक ६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्राप्त होणाऱ्या अर्जाची छाननी कुलगुरूद्वारे नामित करण्यात येणाऱ्या त्रिसदस्यीय समितीद्वारे करण्यात येईल. समितीचा कार्यकाल हा शैक्षणिक सत्रासाठी किंवा पुढील समितीचे गठन होई पर्यंतचा राहील.

**९. निर्णयाधिकार** -

सदर निवडीबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना निर्णय देण्याचे अधिकार राहतील. अपिलीय अधिकारी म्हणून मा.कुलगुरू राहतील.

**१०. शैक्षणिक शुल्काची प्रतिपुर्ती -**

या योजनेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपुर्ती शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयाला प्रदान करण्यात येईल. त्यासाठी संबंधित सर्व मूळ कागदपत्रे अर्जा सोबत जोडावी लागतील.

**११. अनुशासन व तक्रार निवारण -**

निवड झालेल्या कोणत्याही विद्यार्थी / विद्यार्थीनीने सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी खोटी माहिती वा खोटे दस्ताऐवज सादर केले असतील आणि त्यासंबंधिची तक्रार प्राप्त झाल्यास त्या तक्रारीची शहानिशा मा.कुलगुरू महोदयाद्वारे गठीत करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीमार्फत केली जाईल. तक्रारीमध्ये तथ्यांश आढळून आल्यास सदर विद्यार्थी / विद्यार्थीनी या योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरणार नाही व सदर्हु योजनेच्या लाभासाठी खोटी माहिती पुरविल्याबद्दल त्या विद्यार्थ्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याचे व त्याचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार मा. कुलसचिवांना राहतील.

**१२.पालकांचे संमतीपत्र -**

सदर योजनेअंतर्गत निवडण्यात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थी / विद्यार्थीनीस परिशिष्ट 'क' नुसार पालकांचे संमतीपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

**१३.अधिकार-**

सदर योजनेच्या स्वरुपासंदर्भात गरजेनुसार बदल करण्याचे अधिकार मा. कुलगुरू महोदयांना राहतील.

**(डॉ. अविनाश असनारे)**
प्र.संचालक,
विद्यार्थी विकास
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

********************

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

**संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजना**
**आवेदन पत्र**
**सादर करावयाची अंतीम तिथी - ३१ ऑगस्ट**
**शैक्षणीक सत्र २०  - २०**

**परिशिष्ट - अ**

विद्यार्थी/विद्यार्थीनीचे
प्राचार्याद्वारे स्वाक्षांकित
केलेले छायाचित्र
येथे लावावे

**प्रति,**
**मा.प्राचार्य/प्राचार्या/विभाग प्रमुख,**

______________________________

______________________________

______________________________

**विषय : "संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजना" योजनेकरीता नावाची शिफारस करण्याबाबत.....**
**संदर्भ :** संचालक, विद्यार्थी विकास यांचे पत्र क्र.संगाबाअवि/१३/५६/२०१७ दिनांक १८.०८.२०१७

**महोदय/महोदया,**

मी, आपल्या महाविद्यालयामध्ये ................ या शैक्षणिक सत्रात ................ या वर्गात प्रवेश घेतला असून माझे पालक/पत्नी .......................................यांच्या मृत्युमुळे / दुर्घटनेमुळे यांचा आर्थिक स्त्रोत पुर्णपणे बंद झालेला आहे. त्यामुळे मी माझ्या शैक्षणिक सत्राचे शैक्षणिक व परिक्षा शुल्क भरु शकत नाही. तदर्थ, संदर्भाकित अधिसुचनेनुसार संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजने अतंर्गत माझ्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपुर्ती होऊन माझे शिक्षण सुरळीत सुरु राहण्यासाठी संपुर्ण माहितीसह विहीत नमुन्यातील अर्ज संबंधिताकडे शिफारशीसह अग्रेषित करण्याकरीता सविनय सादर करीत आहे, कृपया शिफारस करावी ही विनंती.

| | |
|---|---|
| **१.विद्यार्थी/विद्यार्थीनीचे संपूर्ण नाव** | |
| **२.संपूर्ण पत्ता** | |
| **३.संपर्क भ्रमणध्वनी क्रमांक** | |
| **४.महाविद्यालयाचे/शैक्षणिक विभागाचे नाव** | |
| **५.प्रवेशित वर्ग** | |
| **६.रक्तगट** | |
| **७.एकूण शैक्षणिक शुल्क (विद्यापीठाच्या नियमानुसार)** | |
| **८.अधिकोषाबाबतची माहिती** | |
| अ.अधिकोषाचे नांव | |
| ब.अधिकोष शाखा | |
| क.अधिकोष खाते क्रमांक | |
| ड.अधिकोष आय.एफ.एस.सी.क्रमांक | |
| **९.पालकांचे संमतीपत्र जोडले** | आहे / नाही |
| **१०.पालकांच्या उत्पन्नाचा दाखला जोडला** | आहे / नाही |
| **११.पालकाचा आर्थिक स्त्रोत बंद झाल्यासंबंधिचा दाखला जोडला** | आहे / नाही |
| **१२.पालक/पती यांचे मृत्युचे कारण** | |
| **१३.पालकाचा/पतीचा मृत्युचा दाखला जोडला** | आहे / नाही |

**स्थळ :**
**दिनांक :**

**विद्यार्थी/विद्यार्थीनीची स्वाक्षरी**

**परिशिष्ट - ब**

## प्राचार्यांची/विभाग प्रमुखांची शिफारस

**"संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण"** योजनेंतर्गत निवड होण्याकरीता आमच्या महाविद्यालयामध्ये/शैक्षणिक विभागामध्ये प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थीनी श्री/कु./श्रीमती ---------------------------------------------------------------- यांचा प्राप्त अर्ज मंजूर करण्याकरीता शिफारस करण्यात येत आहे.

दिनांक :
स्थळ : महाविद्यालयाची मुद्रा (प्राचार्याची सही व शिका )

प्रति,
संचालक, विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
अमरावती.

---

**परिशिष्ट - क**

## संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजना
## पालकांचे संमतीपत्र

मी श्री/श्रीमती -------------------------------------------------------
श्री/कु. ----------------------------------------------------------------
ह्याचा/हीचा पालक/अभिभावक असून त्याने संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजनेअंतर्गत सादर केलेल्या अर्जास माझी/आमची अनुमती आहे व तो/ती विद्यापीठाद्वारे अर्ज करण्यासाठी नियमानुसार पात्र आहे. त्याकरीता मी/आम्ही सदर संमतीपत्र स्वाक्षरी करुन सुपूर्द करीत आहोत.

दिनांक :
स्थळ : पालक/अभिभावकाची स्वाक्षरी